'Research Journey' International Multidisciplinary E- Research Journal
मराठी भाषा आणि साहित्य विशेषांक Vol. 3 Issue. 3
ISSN :2348-7143 (Online)
July-Sept.- 2016

# एकनाथांच्या भारूडातील समाजदर्शन व व्यक्तिदर्शन

**प्रा. संगीता सूर्यवंशी**
**मराठी विभाग प्रमुख**
**के. आर. एम. महिला (कला व वाणिज्य)महाविद्यालय, नांदेड.**
**मो. ९९७०७९८८७८**
**Email ID - sangatasuryawanshi@gmail.com**

***नाथांच्या भारुडातील सामाजिकता नाथांच्या सूक्ष्म अवलोकनातून आणि समाजोध्दाराच्या आंतरिक तळमळीतून आलेली आहे. नाथ ज्या समाजात वावरत होते, समाजातील ज्या व्यक्ती ते पाहत होते. त्या व्यक्ती त्यांच्या भारुडात मुक्तपणे वावरताना दिसतात. याशिवाय तत्कालीन समाजव्यवस्था, जातीव्यवस्था, आचार-विचार, रुढी-प्रथा यांचे ही प्रतिबिंब नाथांच्या भारुडातून दिसते.***

नाथांच्या काळात परकीय राजवटीचा परिणाम समाजजीवनावर होऊ लागला होता. त्यामूळे समाजजीवन कांहीसे अस्थिर बनले होते. त्यामुळे अनीती, दुराचार वाढून समाजात स्वार्थ बोकाळत होता. हिंदूतील स्वत:ला श्रेष्ठ समजणारे, विव्दान पंडित समजणारे, देवा-धर्माच्या नावावर अज्ञानी, गरीब, भोळया लोकांचे शोषण करू लागले. मुस्लिम अवलिया आपल्या धर्माचा पगडा येथील समाज मनावर बसविण्याचा प्रयत्न करू लागले. त्यामुळे अज्ञानी लोकांची अगदी केविलवाणी स्थिती झाली. मानसिक दृष्टया दुर्बल बनत चाललेला समाज नाथांच्या काळी अस्तित्वात येत होता.

समाजाची अशी अवस्था पाहून नाथ अस्वस्थ होत. समाजाच्या कल्याणाची, त्यांच्या सर्वांगिण विकासाची तळमळ असल्यामुळे त्यांनी भारूडाची निर्मिती केली. त्यातून समाजजीवनाचे प्रतिबिंब पडणे स्वाभाविकच होते. समाजातील निरनिराळे स्तर, त्या स्तरातील विविध जाती-जमाती, त्यातील व्यक्ती, त्यांची वैशिष्टये, समाजातील आचार-विचार, रूढी-प्रथा, धर्मभावना, उच्च - कनिष्ठ भेद इ. उल्लेख आणि चित्रण नाथांच्या भारूडात आले आहे.

एकूणच समाजव्यवस्थेत ब्राम्हणाला वरच्या स्तरात आणि महार-मांग यांना अत्यंत खालच्या स्तरात स्थान होते. यादृष्टीने नाथांची भट-भटीण, कुत्रा आणि ब्राम्हण, महारीण, मांग, जोहार इ. भारूडे चिंतनीय आहेत. याशिवाय तत्कालीन समाज जीवनात वावर असलेल्या वासूदेव, गोधंळी, वाघ्या-मुरळी, भुत्या, डोंबारी, गारूडी, कोल्हाटी, जंगम, माळी इ. जातीची वैशिष्टयेही नाथांच्या भारूडातून व्यक्त झालेली आहेत. तत्कालीन समाजचित्रणत कौटुंबिक जीवन, जाती-जमातीचे विशेष, गावच्या कारभारातीत पाटील, कुलकर्णी, देशमुख, देशपांडे, जागल्या, चोपदार इ. चा सहभाग ही नाथांनी चित्रित केला आहे. नाथ कालीन ग्रामव्यवस्थेतील प्रमुख असलेल्या व्यक्तीचे काही उल्लेख टिटवी या भारूडात आले आहेत -

**मरेल चौगुल्याची सून ।**
**पाटलाचे चौघेजण ।**
**कुलकर्ण्याची लाडकी सून ।**
**आता गावात राहीलो ।**
**देशमुख, देशपांडे, चौधरी जण ।**
**शेटे, महाजन नेईन कोण । कोणगा ।।२।।**
**चौगुल्याचे जवळ मरण ।**
**महारा, मांगाचा तुला आसरागा ।**

**लव्हार, सुतार, बलुतेबारा।**
**माळी, तेली, वाण्याचा दरारा।।**

असे या भारूडातून तत्कालीन ग्रामजीवनावर प्रकाश टाकणारे विचार आहेत:

स्वार्थी आणि भोंदू लोकांनी धर्माचे स्त्रोम माजवून समाजातील भोळ्या-भाबड्या लोकांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन, त्यांनी अनेक दैवते, उपासना आणि परमेश्वर भक्तीची साधने निर्माण केली. त्यामुळे त्यांची विचार करण्याची क्षमता नष्ट झाली. ग्रामदेवतांचा लोकांच्या मनावर पगडा बसला आणि अंध:श्रध्देला खतपाणी मिळाले. उपासनेत पशू-पक्षी, प्राणी यांच्या बळी देण्याच्या प्रथेला, लिंबा - नारळांना महत्व येऊन भगतांना अवास्तव महत्व वाढले म्हणुन नाथांची येसाबाई, यल्लमा, सटवाई, मरीआई यांच्यावरील भारूडे प्रकाश टाकणारी आहेत.

तत्कालीन समाजजीवनाचे चित्रण करताना नाथांनी ब्राम्हण, भट, साधू, जोगी, बैरागी, फकीर, मानभाव इ. पोटभरू आणि स्वार्थी वृत्तीचाही अत्यंत परखडपणे भारूडातून समाचार घेतला आहे. त्याच्या सटवाई या भारूडातून तथाकथित उपासना विधीचे वर्णन पुढीलप्रमाणे आहे -

**अठराजण कपाळी लाविती विभूती।**
**नवस बोन करती।**
**वर पाळणा टांगती बया बैस।**

आणि संन्याशांचे नाथांनी केलेले पुढील वर्णन -

**वर वर शेंडी बोडी।**
**जानवे तोडूने धोत्रे फाडी।**
**हाती घेऊनि दंड लाकडी। सावध होई।।**
**वर वर म्हणती नारायण।**
**अंतरी विषया वरी ध्यान।**
**कासया संन्यास घेऊन। सावध होई।।**

परमेश्वर भक्तीसाठी संन्याशी झालेली व्यक्ती कशी होती याचे परखड चित्रण नाथांनी केले आहे. समाजातील ढोंगी, दांभिक अणि स्वार्थी साधूंचा परखड समाचार नाथ पुढीलप्रमाणे घेतात -

**पोट भराया फकीर झाला।**
**अल्हा - अल्हा म्हणता जन्म गेला।**
**झालो म्हणती मानभाव।**
**अंतरी शुद्ध नाही भाव।**
**पोट भराया कितर्ण करिती।**
**लोका अर्थ सर्व दाविती।**
**भोळे - भोळे भोंदिती।**
**आपण वर्म नेणती कितर्नाचे की।।**

अनेक प्रकाराची दैवते निर्माण करून त्यांच्या नावाने स्वार्थ साधणारा एक वर्ग समाजात निर्माण होऊ पाहत असल्याचे चित्र नाथांच्या भारूडात येते. यावरून तत्कालीन समाज मनाचे रूप आपल्या लक्षात येते. म्हणजेच बहुजन समाज हा अंधश्रद्धांना बळी पडून दांभिक व ढोंगी सांधूच्या नादाला लागत होता. समाजातील धर्मभावना हळूहळू नष्ट होत होती. त्यामुळे लाकजागृतीचे एक माध्यम म्हणून नाथांनी भारूडाचा स्वीकार केला.

थोडक्यात नाथांच्या भारूडातील समाजजिवनाला परमार्थाच्या दृष्टीने ही अंत्यत मोलाचे स्थान आहे. लौकिक आणि पारलौकिक यांचा समन्वय नाथांनी आपल्या भारूडात साधून त्यांनी एकाचवेळी प्रपंच आणि परमार्थ या दोन्हीची चर्चा केली हे विशेष आहे.

**भाषाशैली :-**

मराठी भाषेचे ऐश्वर्य पाहावयाचे असेल तर ते नाथांच्या भारूडात आहे असे म्हणता येईल. इतकी भारूडांची भाषा श्रीमंत आहे. नाथांनी आपली ग्रंथरचना ही प्रामुख्याने लिहीता - वाचता येणाऱ्या लोकांसाठी केली. पण जनसामान्यांना, अशिक्षितांना आणि समाजातील अज्ञानी लोकांना अध्यात्मज्ञान सांगण्यासाठी त्यांनी भारूडे लिहिली असल्यामुळे ती भाषा रोजच्या व्यवहारातली व ओळखीची स्विकार करून मराठी भाषेचे वैभव दाखवून दिले. यावरून त्यांच्या ग्रंथलेखनाच्या भाषेपेक्षा भारूडांची भाषा प्रगल्भ असूनही आज्ञानी लोकांना चटकन लक्षात येणारी आहे.

नाथांच्या भारूडांची भाषा ही लोकभाषा, बोलीभाषा आहे. भारूडांचा विषय, त्यातील व्यक्ती, त्यांचे समाजातील स्थान, भारूडातील व्यक्ती - घटना - प्रसंग आणि अनुभव ज्या समाज गटातील आहेत. त्या समाजगटाची बोलीभाषा, त्या भाषेतील शब्दवैभव भारूडात दिसते. म्हणजेच डोंबारी, कंसारणी, वैदिणी, भट - बामणाची, महारा - मांगाची इ. भारूडांतून त्यांचीच भाषा दिसते. त्यामुळे भारूडाला एक प्रकारचा जिवंत पणा लाभला आहे. याशिवाय तेलगू, कानडी, हिंदी, उर्दू या भाषेशी संबाद साधणारी आहे.

भारूडातील भाषा अनेक वळणे घेतल्यामुळे एक प्रकारचा लवचिकपणा ही या भाषेला प्राप्त झाला आहे. भारूडातील पात्राप्रमाणे त्या भाषेचे रूप, रंग, ढंग आणि साज नाथांनी आपल्या भारूडात घातलेला आहे. नाथांची भाषा आपल्याला वरवर पाहता ओबड - धोबड वाटत असली तरीही ती अंतरंगात मात्र जिव्हाळ्याची आहे. त्यांची भाषा कधी उपरोधिक बनते, तर कधी ती अद्‌भूततेने आश्र्चचकित करते, कधी वास्तवाचे बेधडकपणे दर्शन घडवते, कधी मिस्किल, थट्टा करून गालावर खळी उमटविते, कधी रोखठोक बोलून ऐकणाराला गप्प बसविते. कधी अंधकाराचा साज लेवून आपले वैभव दाखवून देते, कधी निरलंकृत होऊन आपला साधेपणा प्रकट करते. म्हणून भारूडातील पात्राच्या संस्कृतीप्रमाणे नाथांच्या भारूडाची भाषेतही ग्राम्यता, अश्लिलता आलेली असली तरीही तिच मूळभाव मात्र सात्विकच असतो.

समर्पक शब्द योजना करण्याचे नाथांचे कौशल्य प्रशंसनीय आहे. कारण त्यांचा शब्दसंग्रह प्रचंड होता. शब्दाची जडण - घडण ही चमत्कृतीजन्य आणि अनुप्रासयुक्त असल्यामुळे त्यांच्या शब्दांना नाद येत असे. त्यामुळे श्रवणसुखाचा प्रत्यय हा त्यांच्या भाषेला लाभलेला एक स्वाभाविक विशेष आहे. नाथांची आपल्या शब्दांवर पकड असल्यामुळे साध्या शब्दापासून ते कुटात्मक - गहन अशा अर्थाच्या शब्दांचा वापर ही अगदी सहजपणे करतात. भाषेला हवे तसे वाकविण्याचे कसब नाथांच्या भाषा सामर्थ्यात असल्यामुळे श्रोत्या प्रमाणे, पात्राप्रमाणे नाथांची भाषा ही रूप धारण करते. त्यामुळे भारूडातील पात्रे आणि रसिक यांच्यात सुसंवाद साधून एक प्रकारची जवळीक निर्माण होते.

मराठी भाषेचा आपल्या भारूडांसाठी नाथांनी किती समर्थपणे उपयोग केला आहे याचा अनुभव त्यांच्या वेगवेगळ्या भारूडातून येतो. फुलोरा, जोगवा, अदिमाया इ. भारूडांचे वळण वेगळे आहे. कंसारीण, महारीण, जोहार - सासुरवासीन इ. भारूडांची भाषाही वेगळे रूप घेतले. नाथांचे अनुभव विश्व साजर करणारी भाषा आहे. एवढेच नव्हे तर नाथांच्या शब्दसंग्रहातील काही वैशिष्ट्यपूर्ण शब्द पाहता त्यांच्या भाषा प्रभूत्वाची ओळख पटते. काही शब्द सांगता येतील. सैराट, हाट, बोभाट, पेठ, मसी, गव्हार, बाईल, बसवी, शिंदळ, दादला, नोवरी, हुंडगी, गऱ्हवार, लालचावणे, दारवंटा, जगडंबर, ढिसाळ, होड, बुरगुंडा इ. शब्द हे दररोजच्या वापरातील असल्यामुळे नाथ हे शब्द सहजपणे भारूडांतून उपयोगात आणल्यामुळे भाषेला एक प्रकारचे चैतन्य आले आहे.

नाथांच्या भारूडांची भाषा ही जनसामान्यांची असल्यामुळे मराठी भाषेची संपन्नता, मराठी भाषेचे वैभव आणि मराठी भाषेचे अनेक विलासही भाषेत पाहयाला मिळतात. तसेच त्यांच्या भाषेला अंतरीचा जिव्हाळा आणि अनुभव विश्वाचे बळ मिळाल्यामुळे ही भाषा अधिक वैशिष्ट्यपूर्ण बनली आहे. साधुत्व आणि कवित्व हे नाथांच्या व्यक्तिमत्वाचे दोन महत्वाचे विशेष/पैलू हे त्यांच्या कृती आणि उक्तीतून दिसतात. नाथांची प्रतिभा विश्वाला गवसणी घालणारी असल्यामुळे प्रत्येक भारूड म्हणजे जीवनाचे एक व्यक्त रूप आहे. त्यामुळेच त्यांच्या भारूडांत विषयाची विविधता आलेली आहे. लौकिकाकडून - अलौकिकाकडे, प्रपंचाकडून - परमार्थाकडे असा नाथांचा प्रवास आहे.

आपल्या भारूडांतून नाथांनी आपल्या मनाची आणि जनमनाची स्पंदने अभिव्यक्त करून परस्परात सुसंवाद साधला आणि त्यातून प्रपंच व परमार्थाची खरी ओळख करून दिली. जी मानवी जीवनात मानवतेच्या दृष्टीने अत्यंत मोलाची असते. त्यांच्या भारूडातून व्यक्त होणाऱ्या आशयात अनुभवांची खोली आणि संपन्नता आहे. कल्पना विलासा बरोबर विचारांचे वैभव आहे आणि या साऱ्यातून भारूडाला आलेली कलात्मकता आहे. ही कलात्मकता अभीव्यक्तीतून घडणाऱ्या जीवनदर्शनात ही आहे. त्यांच्या भारूडात अनेक गोष्टी एकत्र झाल्या आहेत. काव्य आणि नाट्य, अध्यात्म आणि साहित्य, लौकिक आणि पारलौकिक, लोक कला आणि लोक वाङ्मय, अभिधा आणि लक्षणा, व्यक्तीमत्व आणि लोकमानस, प्रपंच आणि परमार्थ, रंजन आणि उद्‌बोधन इ. चा सुंदर समन्वय नाथांच्या भारूडात झालेला एक अपूर्व संगम दिसून येतो.

जनसामान्यांच्या मनांशी त्यांच्या भारूडांच्या रूपाने नाथांनी साधलेला/घातलेला सुसंवाद हा आजही त्यांचे अतूट नाते कायम राखले आहे. यावरून आपल्याला असे म्हणता येईल की, भारूडांचे अक्षरत्व मराठी वाङ्मयाच्या दालनात नाथांनी आपल्या भारूडांच्या रूपाने घातलेली भर ही मौल्यवान असून ती मराठी वाङ्मयाचे वैभव दाखवणारी अशीच आहे.

**व्यक्तीदर्शन :**

व्यक्तीदर्शन हा नाथांच्या भारूडांचा एक महत्वाचा विशेष आहे. समाजाच्या विविध स्तरातील वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तींची निवड करून त्या - त्या व्यक्तींचे दर्शन घडविण्याचा प्रयत्न केला. त्यावरून नाथांच्या सूक्ष्म समाज अवलोकनाची कल्पना येते. त्याच प्रमाणे तत्कालीन समाजजिवनाचे चित्रही नाथांच्या भारूडांतून पाहावयास मिळते. नाथांच्या भारूडांतील व्यक्तीचे स्थूलमानाने भाग पाडता येतील.

**मराठी लोकसंस्कृतीचे उपासक :-** नाथांच्या भारूडांत मराठी लोकसंस्कृतीची जोपासना करणाऱ्या कांही पारंपारिक उपासकांचे दर्शन घडते. यात वासुदेव, गोंधळी, वाघ्या - मुरळी, भुत्या इ. चा समावेश होतो.

**पोटासाठी भटकणाऱ्या जमातीतील व्यक्ती :-** उदारनिर्वाहासाठी, पोटासाठी काही जमाती हया कित्येक शतकापासून भटकंती करीत आहेत. ग्रामीण भागात निरनिराळ्या प्रकारचे खेळ करून या जमातीतील लोक मनोरंजन करूण आपला उदरनिर्वाह करतात. यात डोंबारी, गारूडी इ. चा समावेश होतो.

**देव - देवतांचे उपासक :-** श्रद्धा असलेल्या आणि परमेश्वर उपासनेत महत्व असलेल्या कांही व्यक्ती वरही नाथांनी भारूडे रचली. त्यात संन्याशी, जंगम, खेळीया इ. चा समावेश होतो.

**गाव कारभारातील व्यक्ती :-**गावाच्या कारभारात महत्व आणि विशिष्ट स्थान असलेल्या विविध व्यक्तींचे दर्शन ही भारूडांत घडते. पाटील, कुलकर्णी, देशमुख, देशपांडे, चौगुले, नाईकवाडे, जागल्या, चोपदार इ. व्यक्तींचा निर्देश होतो.
**उच्चवर्णीय गट :-** समाजातील उच्चवर्णीय व्यक्ती म्हणजे भट, ब्राम्हण, महाजन इ. चे चित्रण ही भारूडांत येते.

**खालच्या स्तरातील गट :-** समाजातील खालच्या स्तरातील व्यक्ती म्हणजे महार, मांग इ. व्यक्तींचाही भारूडांत नाथांनी वापर केला.

**अपंग व्यक्ती :-** शारीरिक व्यंग असलेल्या व्यक्तीही नाथांच्या सूक्ष्म दृष्टीतून सुटलेल्या नाहीत. आंधळा, पांगळा, मुका, बहिरा आणि मानसिक व्यंग असलेली व्यक्ती म्हणजे वेडा यांच्यावर ही भारूडे तयार झाली.

**स्त्री व्यक्तीरेखा :-** पुरूषाप्रमाणेच भारूडांतून नाथांनी स्त्रियांचेही चित्रण केले आहे. त्यामध्ये ही वेगळेपणा दिसून येतो. भटीण, महारीण, कोल्हाटीण, डंकारीण, सौरी, वैदीण, सासुरवाशीण, शंखीण - डंखीण अशा व्यक्ती रेषा येतात.

समाजातल्या विविध थरातील प्रतिनिधीत्व करणाऱ्या व्यक्ती या व्यक्ती आहेत. त्याप्रमाणे पारंपारिकता जाती - व्यवसाय, स्वभाव इ. वैशिष्ट्यानी युक्त असलेल्या या व्यक्ती आपल्या रचना तयार करण्यासाठी नाथांनी वापरल्या. त्यांच्या वैशिष्ट्यानुसार अध्यात्म - परमार्थ सांगण्यासाठी त्यांच्या कलात्मक उपयोग करून घेतला. त्यामुळे त्यांच्या भारूडांत या व्यक्तींना व त्यांच्या वैशिष्ट्यांना एक आगळे - वेगळे महत्व आले आहे.

भारूडांतील व्यक्ती अत्यंत रेखीव आणि उद्बोधक असल्यामुळे त्यांच्या माध्यमातून जनसामान्याशी साधलेला सुसंवाद, प्रपंचे आणि परमार्थ यांचे सोप्या पद्धतीने स्पष्टीकरण करणारा आहे. त्यांची वैदीण आपल्या पारंपारिक वेशभूषेतून आणि सर्व साहित्यानिशी जेव्हा अंगणात उभे राहून "सुया घ्या, पोती घ्या, वायीचे, वातीचे औषध घ्या वो माय" अशी ललकारी देते तेंव्हा घरातील गृहिणी अंगणात येते आणि वैदिणीशी बोलते तेव्हा तिच्या पारमार्थिक गोष्टी करते. नाथांनी या व्यक्तींचे रेखाटन करताना लौकिक जीवनातील त्यांचे रूप दर्शवून जनसामान्याची आणि या व्यक्तीची प्रथम गाठ घालून दिली आणि मग त्यांच्या संवदातून पारलौकिक जीवनाचे दर्शन घडवून त्यांचे वेगळेपण सिद्ध केलेले आहे. या व्यक्तींचा समाजात वावर असल्यामुळे त्या लोकांच्या परिचयाच्या आहेत. त्यामुळे त्यांच्याशी सहजपणे जवळीक साधली जाते. त्यांच्या या संवादातून आत्मा - परमात्मा, देह, प्रपंच आणि जिवाला ग्रासणारे विकार सांगितले जात असल्यामुळे या परिणामकारकता दिसून येते.

RESEARCH JOURNEY

नाथांनी जोशाचे स्वरूप सांगितले आहे -

**मनाजी पाटील देहगावचा।**
**विश्वास धरू नका त्याचा।**
**हा घात करील नेमाचा।**
**वासना बायको शेजारीण।**
**झगडा घाली मोठा दारूण।**

तसेच नाथांची कोल्हाटीण ही अज्ञानाचे पटल दूर होण्याचा अनुभव सांगते -

**भ्रांती लुगडे फिटून गेले।**
**काया झाली उगडी।**
**पूर्ण अनुभव कळूनि।**
**त्यांसी माडिली फुगडी।**

एखाद्या व्यक्तीचे वैशिष्ट्य लक्षात घेऊन त्यावर अध्यात्म्याचे रोपण करण्याची नाथांची किमया प्रत्येक व्यक्ती मागील वेगळेपण सिद्ध करते.

नाथांच्या भारूडातील अशा अनेक व्यक्ती आपापल्या वैशिष्ट्यांसह लोकांपुढे येऊन आत्मबोध करताना दिसतात. यामधून नाथांच्या प्रतिभेची, कल्पकतेची आणि विषयनिवडीतील जादू लक्षात घेतली, तर त्यांच्या कवित्वाची,

समाजोद्धाराची तळमळ असलेल्या मनाची ओळख पटते त्यांच्या भारूडांतील व्यक्ती म्हणजे त्यांना आलेल्या आत्मानुभवाच्या अभिव्यक्ती करणाऱ्या आत्मज्ञानी आणि साक्षात्कारी थोर व्यक्तीच आहेत असे म्हणता येईल. त्यांचे हे रूप अत्यंत मोलाचे आहे.

**संदर्भ ग्रंथ :-**

१. एकनाथांची भारूडे : शरद व्यवहारे - साहित्य सेवा प्रकाशन, औरंगाबाद.

२. एकनाथी भारूड : पाठक वा.ल.

३. संत एकनाथांचे स्फूट लेखन : डॉ. सौ. कुमुद गोसावी.

४. सकल संत गाथा भाग ३ : डॉ. रा.चिं. ढेरे.